**<u>जलयुक्त शिवार अभियान</u>**
**जलसंपदा व इतर विभागातील तांत्रिक /अतांत्रिक कर्मचारी यांच्या सेवा आवश्यकतेनुसार अन्य दुसऱ्या विभागात तात्पुरत्या स्वरुपात वळविण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**जलसंधारण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः जलशि-२०१५/प्र.क्र.०६/जल-७**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख : ३ फेब्रुवारी, २०१५

# शासन परिपत्रक

**<u>पहा</u>:-** १. शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र. जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७, दि. ५ डिसेंबर,२०१४

२.शासन शुध्दीपत्रक ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र. जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७, दि. २८ जानेवारी,२०१५

टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान राबविण्या संदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या दि. ५ डिसेंबर, २०१४ रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री महोदयांनी सन २०१४ मधील हिवाळी अधिवेशनात सभागृहात दुष्काळावर मात करण्यासाठी काही कायमस्वरुपी योजना जाहिर केल्या आहेत. त्यामध्ये पुढील ५ वर्षात ५० हजार सिमेंट नालाबांध बांधण्याचा कार्यक्रम अंतर्भूत असून त्याचाच एक भाग म्हणून जलसंधारण विभागामार्फत सन २०१५-१६ मध्ये एकूण १० हजार सिमेंट नालाबांध बांधण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे. जलयुक्त शिवार अभियान हा शासनाचा अत्यंत महत्वाकांक्षी असा कार्यक्रम असून या कार्यक्रमाच्या प्रगतीबाबतचा आढावा मा. मुख्य सचिव / मा. मुख्यमंत्री यांचे स्तरावर दरमहा घेण्यात येत आहे.

२. वर नमूद केल्यानुसार टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी उपाययोजनेचा भाग म्हणून विभागाने सन २०१५-१६ मध्ये एकूण १०,००० साखळी सिमेंट नालाबांधण्याचे उद्दिष्ट निश्चित केलेले आहे. त्यासाठी विभागाच्या अर्थसंकल्पात सुमारे रु. १००० कोटीची तरतुद करण्यात येणार आहे. या तरतूदीपैकी सुमारे ६०० कोटी इतकी रक्कम पहिल्या टप्प्यात जून अखेरपर्यंत पूर्ण करावयाच्या ६००० साखळी सिमेंट नालाबांध करता उपलब्ध होणार आहे. सदर ६००० साखळी सिमेंट नालाबांध बांधण्याच्या कामाची व्याप्ती फार मोठी असून या सर्व कामांचे सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रके तयार करणे, निविदा प्रक्रिया सुरु करणे, निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कार्यान्वयन आदेश देणे व कामे पूर्ण करुन घेणे इत्यादी सर्व कामे लघु सिंचन (जलसंधारण) यंत्रणेच्या आस्थापनेवरील रिक्त पदांची

टक्केवारी (२९%) विचारात घेता जिकरीचे आहे. त्याचप्रमाणे साखळी सिमेंट नालाबांध कार्यक्रमांतर्गत टप्पा १,२ व ३ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या कामांपैकी अपूर्ण कामे / प्रगतीपथावरील कामे देखील पूर्ण करावयाची असून ही सर्व कामे व नव्याने हाती घ्यावयाची साखळी सिमेंट नालाबांधाची कामे पूर्ण करण्याकरिता Working Season केवळ जानेवारी ते जून २०१५ इतकाच उपलब्ध आहे.

३ या संदर्भात दिनांक २२/१२/२०१४ रोजी पार पडलेल्या नागपूर विभागाच्या कार्यशाळेत मा. मुख्यमंत्री महोदयांनी या योजनेच्या प्रभावी व योग्य अंमलबजावणीकरिता जिल्हाधिकारी हे योजनेचे प्रमुख जबाबदार असल्याचे निर्देशित केले आहे. त्यांनी जिल्ह्यात पुढाकार घेवुन नियोजन पद्धतीने काम करावे असेही सुचित केले आहे. सबब, जलयुक्त शिवार अभियान या शासनाच्या अत्यंत महत्वकांक्षी अशा कार्यक्रमांतर्गत लघु सिंचन (जलसंधारण) यंत्रणेमार्फत वा अन्य कोणत्याही यंत्रणेमार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रगतीपथावरील व नवीन कामे पूर्ण करण्याकरिता त्याचप्रमाणे दुरुस्तीची कामे करण्याकरिता जिल्हाधिकारी यांना आवश्यक वाटेल त्यानुसार जलसंपदा वा इतर विभागातील तांत्रिक/अतांत्रिक अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा आवश्यकतेनुसार अन्य दुसऱ्या विभागाच्या कामांकरिता तात्पुरत्या कालावधीकरिता वळविण्याचे सर्व अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०१२२११४५१२९३२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vinod Sitaram Wakhare

Digitally signed by Vinod Sitaram Wakhare
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=RDD & Water Conservation Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Vinod Sitaram Wakhare
Date: 2015.02.06 17:06:56 +05'30'

**(वि.सि. वखारे)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधान परिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. सर्व सन्माननीय विधानसभा/ विधान परिषद व संसद सदस्य.
५. मा.मंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.

६. मा.राज्यमंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
७. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
८. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव , मंत्रालय, मुंबई.
१०. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन), मंत्रालय, मुंबई.
११. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे-४११ ००१.
१२. सर्व विभागीय आयुक्त.
१३. संचालक (मृदसंधारण), कृषि आयुक्तालय, पुणे-४११ ००१.
१४. प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५. मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण), पुणे
१६. मुख्य अभियंता,विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम,नागपूर.
१७. संचालक, महाराष्ट्र सुदूर सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१८. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१९. मुख्य कार्यकारी अधिकारी/ अप्पर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे.
२०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरीता).
२१. सर्व जिल्हाधिकारी.
२२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी / अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२३. महालेखापाल एक व दोन, महाराष्ट्र राज्य , मुंबई/ नागपूर (लेखा परीक्षा व लेखा व अनुज्ञेयता).
२४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२५. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
२६. सर्व उपायुक्त (विकास) ,विभागीय आयुक्त कार्यालय,
२७. सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
२८. सर्व अधिक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ,
२९. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी.
३०. सर्व कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण).
३१. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,.
३२. सर्व मंत्रालयीन विभाग
३३. सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव/ कार्यासन अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
३४. नियोजन विभाग/ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
३५. जल-७, निवड नस्ती.